# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्कर/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३ दिनांक ०७.०६.२०२०

वाचाः- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश दि. १५.०४.२०२०, दिनांक १९.४.२०२० सुधारीत आदेश दिनांक २०.४.२०२०, दि.२१.०४.२०२०, दि.२३.०४.२०२० आदेश दिनांक ३.५.२०२०, दिनांक १७.०५.२०२०, दिनांक १९.०५.२०२०, दि.२१.०५.२०२०, विस्तारित आदेश दिनांक २२.०५.२०२० दिनांक ३१.०५.२०२० व, दिनांक ०४.०६.२०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई आदेश क्रं. DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि.०२.०५. २०२०, ०३.०५.२०२०, ०५.०५.२०२०, १५.५.२०२०, १७.०५.२०२०, १९.०५.२०२० ,दि.३१.०५.२०२० व दिनांक ०४.०६.२०२०.

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना च्या अनूषंगाने नांदेड जिल्हयात (लग्नसंमारंभासाठी मंगल कार्यालय च्या वापराबाबत निर्देश.)

## आदेश

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक ०३ वरील शासनाचे आदेश दिनांक ३१.०५.२०२० च्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्र. १ वरील आदेशान्वये नांदेड जिल्हयातील हॉटेल / रेस्टॉरन्टस व इतर आदरातीथ्य सेवेचा वापर सार्वजनिक लोंकासाठी प्रतिबंधीत करण्यात आले आहे. तसेच शासनाचे आदेशानुसार लग्न संमारंभासाठी ५० व्यक्तींना नियम व अटीच्या अधिन राहून उपस्थित राहण्याची मुभा देण्यात आली आहे.

आणि माझे असेही निदर्शनास आले आहे की, लग्नसंमारंभास ५० व्यक्तीपर्यत दिलेली मर्यादेच्या अनुषंगाने लोकांकडे त्यांची स्वतःची किंवा नातेवाईकाकडील जागेत लग्नसंमारंभ पार पाडण्यास जागा उपलब्धते बाबत अडचणी निर्माण होत आहेत तसेच कमी जागेत लग्नसमारंभ पार पाडल्यास त्या ठिकाणी सामाजिक अंतर व कोविड- १९ रोगाचा प्रादुर्भाव रोकण्यासाठी निश्चित केलेले नियम व अटीचे उल्लंघन होण्याची दाट शक्यता आहे.

त्याअर्थी लग्न संमारंभासाठी लोकांची गैरसोय व कोविड- १९ रोगाचा प्रादुर्भाव रोकण्यासाठी निश्चित केलेले नियम व अटीचे उल्लंघन होऊ नये तसेच सदर रोगाचा प्रादुर्भाव रोकण्याच्या दृष्टीने उपाय योजनेच्या एक भाग म्हणून नांदेड जिल्हयातील मंगल कार्यालय ठिकाणी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून केवळ लग्नसंमारंभाच्या आयोजनासाठी परवानगी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती

- एका वेळेस लग्न समारंभाच्या ठिकाणी मंगल कार्यालय मधील कर्मचारी व लग्नासाठी उपस्थित सर्व व्यक्तींची संख्या ५० पेक्षा जास्त असणार नाही.
- Social Distancing चे पालन करावे.
- लग्न समारंभाच्या प्रवेशापुर्वी हॅन्डवॉश , सॅनिटायझरचा वापर करणे तसेच थर्मल स्क्रिनिंगद्वारे प्रत्येक व्यक्तींची तपासणी करूनच प्रवेश देणे.
- सदर ठिकाणी सर्वांच्या चेह-यावर मास्क असणे व सामाजिक अंतराचे पालन करणे.
- मानवी संपर्कात येणा-या सर्व वस्तू / ठिकाणांचे वेळोवेळी नियमीत र्निजंतूकीकरण करणे.
- सदर लग्न संमारंभ सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० या कालावधित करणे तसेच लग्नसंमारंभाची पुर्ण प्रक्रिया ५ ते ६ तासाच्या आत संपविणे बंधनकारक असेल.
- उपरोक्त प्रमाणात सॅनिटायझरचा साठा असावा.
- कोणताही आजारी व्यक्ती लग्न समारंभास येणार नाही.

D PC CORONA

Scanned with CamScanner

# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com


- अशा ठिकाणी ५५ वर्षावरील जेष्ठ नागरिक, ज्यांना मधुमेह (Diabetes), रक्तदाब (Blood Pressure) आणि इतर अनेक आजार असलेल्या व्यक्ती (Co-morbidities), गरोदर माता, व दहा वर्षाखालील मुलांना शक्यतोवर प्रवेश टाळावा.
- लग्नामध्ये येणा-या लोकांची यादी Incident Commander यांना सादर करावी, सदर यादी, लग्नाच्या अगोदर सादर करावी व त्यामध्ये लग्नाला येणा-या लोकांचे मोबाईल क्रमांक व पत्ते असणे आवश्यक राहील.
- मंगल कार्यालयाच्या आवारात थुंकण्यास प्रतिबंध करण्यात यावे.
- सदर जबाबदारी ही मंगल कार्यालय मालक यांची राहील.
- वरील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास अशा मंगल कार्यालयाचे [illegible] परवाने रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल व संबंधित आस्थापना चालकाविरुध्द साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

सदर आदेशात नमुद संपुर्ण निर्देशाचे तंतोतंत पालन होते किंवा नाही या बाबी तपासून आवश्यक कायदेशिर व दंडात्मक कारवाई करण्यास खालील यंत्रणेस प्राधिकृत करण्यात येत आहे.

- **महानगरपालिका हद्दीत :- महानगरपालिका व पोलीस विभाग यांनी संयुक्त पथके गठीत करावीत**
- **नगरपालिका हद्दीत :- नगरपालिका व पोलीस विभाग यांनी संयुक्त पथके गठीत करावीत**
- **गावपातळीवर :- ग्रामपंचायत व पोलीस विभागाचे संयुक्त पथक गठीत करावे.**

वरीलप्रमाणे सर्व संबंधित यंत्रणेने पर्यवेक्षणासाठी गठीत केलेले पथकाचे आदेश संबंधित उपविभागीय दंडाधिकारी तथा (Incident Commander) यांचेकडे सादर करावीत. संबंधित उपविभागीय दंडाधिकारी तथा (Incident Commander) यांची वरीलप्रमाणे आदेशाची अंमलबजावणीच्या अनुषंगाने संनियंत्रणाची जबाबदारी असेल.

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

हे आदेश दि.०७.०६.२०२० रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आली आहे.

स्वा/-
(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद.

**प्रतिलीपी - आवश्यकत्या कार्यवाहीस्तव**

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. पोलीस अधीक्षक, नांदेड
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
९. सर्व संबंधित यांना अनुपालनास्तव
१०. जिल्हा माहीती अधिकारी, नांदेड

जिल्हादंडाधिकारी नांदेड

Scanned with CamScanner